UGC Care Listed Journal ISSN-0976-5425

# मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

# History Research Journal

Issue - XXVII

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक सत्ताविसावा



कार्यकारी संपादक
प्रा. सोमनाथ रोडे

**UGC Care Listed Journal**

**History Research Journal**

**इतिहास संशोधन पत्रिका**

**Issue. - XXVII   January**

**अंक - सत्तावीस   2022**

**ISSN : 0976 – 5425**

○ प्रकाशक :

प्रा. विजय पांडे

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री

जि. औरंगाबाद भ्रमणध्वनी - ९४२२५ २३२५७

○ **मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

○ संपर्क :

**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**

कार्यकारी संपादक

४ - शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२ - २२८०१०,

भ्रमणध्वनी : ९४२२४ ८३६११, ७५८८६१ ८५६१०

○ **मुखपृष्ठ छायाचित्रे - डॉ. प्रविण चव्हाण, सिल्लोड, औरंगाबाद**

○ **मूल्य : रु. २००/-**

पंचवार्षिक वर्गणी रु. १,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु. २,०००/-

○ **प्रकाशन दि. ०१ जानेवारी २०२२**

○ **अक्षर जुळवणी व मुद्रक :**

**विद्याभारती प्रकाशन**

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर - ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mantralgad Dist Ratnagiri 415214

(१)

# १७33 ते १७3६ या काळातील सिदी - मराठे संघर्षात बाणकोट (हिंमतगड) चे महत्त्व

✲

डॉ. ज्योती पेठकर
लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मंडनगड, जि. रत्नागिरी


लिओपोल्ड वॉन रांके याच्या वस्तुनिष्ठवादी इतिहास लेखनाला छेद देत एनल्स ज्ञान परंपरेने इतिहासविश्वात नवी दृष्टी विकसित केली. या परंपरेने मानवी जीवनाशी संबंधित सर्व घटकांचा समावेश असणाऱ्या समग्र इतिहास लेखनाचा आग्रह धरला. यातूनच स्थानिक इतिहास ही इतिहास शाखा उदयास आली. या दृष्टिकोनातून मी रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट / हिंमतगड उर्फ फोर्ट व्हिक्टोरिया या किल्ल्याचे इ. स. १७३३ ते इ. स. १७३६ या काळातील सिद्दी - मराठे संघर्षातील बाणकोट / हिंमतगड या किल्ल्याचे महत्त्व प्रकाशात आणण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

शिवाजी महाराजांचे रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले एक तर अंतर्गत प्रदेशात किंवा समुद्रकिनाऱ्यावर आहेत. समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या किल्ल्यांचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारात हे किल्ले किनाऱ्यावर आहेत किंवा दुसऱ्या प्रकारात ते बेटावर उभारलेले असून त्याच्या सभोवती समुद्र आहे. भूशिरावरील किल्ल्यांपैकी बहुतेक नदीच्या काठावर आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट, अंजनवेल किंवा गोपाळगड, गोवळकोट, रत्नागिरी, पूर्णगड, जयगड हे असे नदीच्या काठावरील महत्त्वाचे किल्ले आहेत. यांपैकी बाणकोट उर्फ हिंमतगड या किल्ल्याचा आपण विचार करीत आहोत. हा किल्ला आरमार, व्यापार व वाणिज्य या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

**बाणकोट / हिंमतगड उर्फ फोर्ट व्हिक्टोरिया या किल्ल्याचे भौगोलिक स्थान :-**

हा दक्षिण कोकणमध्ये पश्चिम किनारपट्टीवर आहे. हा किल्ला रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मंडनगड तालुक्यात बाणकोट, वेळास व वेसवी बंदराजवळ अनुक्रमे १ व ३ किलोमीटरवर आहे. हा किल्ला तिन्ही बाजूंनी पाण्याने वेढलेल्या बेटावर आहे. या किल्ल्याचे


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425



बाणकोट

ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

समकालीन पत्रांमध्ये सिद्दीच्या कोकणातील प्रजेवर केलेल्या अन्यायाचे, जुलमाचे अनेक उल्लेख मिळतात. हाबशाने कहर उडविला आहे. शामलाने गाव मारून नेले. पाटील धरून कान नाक त्याचे कापले. दोघी बायका ठार मारल्या. दोघा पुरुषाच्या पायाच्या टाचा तोडल्या. वासी तप्याचा गाव मौजे वडंब मारले. वसवलीनजीक कुलाबा येथील चार कोळी धरून नेले. तुपाच्या घागरी भरलेला मचवा कुलाब्यास जात होता. तो हबशाच्या स्वारीस सापडला. उंदेरीस नेला.[२] अशा प्रकारे हबसाणातील व मराठ्यांच्या प्रदेशातील गावांवर हल्ले करून सिद्दी सातने जनतेस त्रस्त केले होते. नोव्हेंबर १७३३ मध्ये परशुराममधील लोकांनी एकत्र येऊन बाजीराव पेशव्याला सिद्दी सातच्या (अंजनवेलचा किल्लेदार) ताब्यातून अंजनवेलचा व गोवळकोट हे किल्ले व त्याखालील मुलूख घेण्याची विनंती केली होती. त्या कामात एक लाख रु. देण्याची तयारी दाखविली.[३] अशा प्रकारे कोकणातील जनता



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203

आक्रमण केले. त्याने बाणकोट खाडीतील दालदि (मुस्लिम कोळी) लोकांना हाताशी धरले. त्यांना छोट्या बोटी देण्याच्या निमित्ताने सिद्दीचे लोक वेसवीस उतरविले. तेथील पेशव्यांच्या दोन चौक्यांवर हल्ला करून त्याने ६०/७० लोक जखमी केले व एक मारला. सिद्दी महागिऱ्या (छोट्या बोटी) घेऊन गेला.[६] पुन्हा नोव्हेंबर १७३३ मध्ये सिद्दीसातने ३०/३५ गलबते भरून युद्धसाहित्य व सैन्य आणून बाणकोटच्या खाडीत शिरून किल्ल्यावर आक्रमण केले. किल्ल्यावरील शिबंदीने त्या हल्ल्याचा तीव्र प्रतिकार केला. सिद्दी सात बाणकोटला पराभूत झाला. तेथून त्याने सुवर्ण दुर्गला जाऊन मेढा जाळल्या. तो सुवर्ण दुर्गावरून अंजनवेलला गेला.[७]

२८ ऑगस्ट १७३३ रोजी सरखेल सेखोजी आंग्रे यांचा मृत्यू झाला. छत्रपती शाहू यांनी सेखोजी यांचे भाऊ संभाजी आंग्रे यांना सरखेल केले. ३१ डिसेंबर १७३३ रोजी पत्र पाठवून बापूराव मल्हार बर्वे यांनी आंग्रे यांनी बाणकोट घेतल्याची बातमी खरी आहे का याची खात्री पेशव्यांकडे करून घेतली.

पेशवे बाजीरावांची पाठ फिरताच सिद्दीने वारंवार बाणकोटवर आक्रमणे केली. या आक्रमणाचा प्रतिकार बाजी भिवराव याने केला. फेब्रुवारी १७३४ मध्ये सिद्दी बाणकोट वेळास जवळच्या प्रदेशात मुक्कामास होता. बाजी भिवराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सिद्दीचा पाडाव करून ८ मार्च १७३४ रोजी बाणकोट जिंकला. कोन्हाजीराव शिंदे व इतर सरदार यांनी पेशव्यांना बाणकोट जिंकल्याचे व सध्या त्याची स्थिती सुरक्षित असल्याचे १५ मार्च १७३४ रोजी कळविले.[१०] बाणकोट किल्ला महत्त्वाचा व नाजूक आहे. तेथील बंदोबस्त कायमी व्यवस्थित व्हावी म्हणून केळशी व वेसवी या दोन महालांच्या वसाणातील वसुलीचा अधिकार बाणकोटकरांना छत्रपती शाहूंनी दिला होता.[११]

बाणकोट जिंकल्यानंतर बाजी भिवरावने एप्रिल १७३४ मध्ये बाणकोट किल्ल्यावर बुरूज व तटबंदीची दुरुस्ती केली. छत्रपतींच्या आज्ञेने रामचंद्र मिर्धे हे या दुरुस्तीच्या कामासाठी आले आहेत. सिद्दीच्या दहशतीने त्याच्या राज्यातील पळून आलेल्या जनतेकडून मजमार देऊन बाणकोटचे बांधकाम करून घेतले. बाजी भिवरावांनी स्वतःला व त्यांच्या सैन्याला होत असलेला त्रास पेशव्यांना सविस्तर कळवून बाणकोटच्या संरक्षणासाठी नव्या दमाची सातशे सैनिकांची तुकडी पाठविण्याची विनंती केली होती.[१२] पेशवे बाजीराव यांनी


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist Ratnagiri

लहान- मोठी वीस लगांडी सिद्दीची धूटमळत असून सैन्य व दारूगोळा पाठविल्यास मंडणगड राहेल तसेच बाणकोटासपण अपाय होणार नाही. मंडणगड सिद्दीकडे गेल्यास अप्रतिष्ठा होईल. आम्हासही उभे राहावयास जागा होणार नाही. खाडी, दर्जा, मंडणगड व सुवर्णदुर्ग अशा कैचीत आम्ही सापडलो आहोत. दोन-तीन रोजात सरंजाम, सामान व कुमक पाठवावी, अशी विनंती हरि गणेश यांनी पेशव्यांना केली. छत्रपती शाहूंना सरखेलांचे कारस्थान बाणकोटकर व महाडकरांकडून कळल्यामुळे त्यांनी संभाजी आंग्रेची खरडपट्टी केली. सरखेलांनी छत्रपतींना न जुमानता सिद्दीशी सलोखा केला. डिसेंबर १७३५ मध्ये सरखेलांनी सिद्दी सातबरोबर वेळशी खाडीत आपली चौकी बसविली. त्या परिसरात दोघांच्या वतनदारांनी महसूल वसूल केला. वेळासच्या गुरवाने रामजी महादेव यांना बाणकोट-जवळच्या सिद्दी सातच्या लष्करी हालचालींची माहिती दिली. सरखेल व सिद्दीसातची एकी व बाणकोटजवळच्या सिद्दीसातच्या हालचालींची माहिती रामजी महादेव यांनी चिमाजी-आप्पांना २३ डिसेंबर १७३५ रोजी कळविली. आंग्रेंचा विरोध नष्ट झाल्यामुळे सिद्दी सातने डिसेंबर १७३५ मध्ये बाणकोट किल्ला जिंकला. सिद्दीपुढे प्रतापगडकडे जाण्याची शक्यता लक्षात घेऊन महादजी अनंत यांनी बाणकोट पडल्याचे सांगून प्रतापगडच्या हवालदारांना सावध केले. या युद्धा वेळी बाणकोटचा किल्लेदार हरि गणेश राजाज्ञा जखमी होऊन पकडला व मारला गेला. बाणकोट दुबळी जागा म्हणून तो पडला, असा उल्लेख सापडतो. सिद्दी सातने बाणकोट घेतल्यानंतर लगेचच डिसेंबर १७३५ मध्ये मंडणगड किल्ल्यास वेढा देऊन तो जिंकला. संभाजी आंग्रेंनी केलेल्या संगनमतामुळेच सिद्दी सातने मंडणगड व बाणकोट जिंकले. बाणकोट जिंकल्यानंतर किल्ल्यावरची सर्व रसद, दारूगोळा गलबतावर चढवून सिद्दी सातने आपले आरमार तयार ठेवले. मराठ्यांचे सैन्य मंडणगडपर्यंत आले की बाणकोट खाडीतून कर्नाळ्याकडे पळून जायचे व कर्नाळ्यावर आक्रमण करायचे, असे सिद्दी सातचे नियोजन होते. याची कुणकुण मराठ्यांना लागली. सिद्दी सातच्या या हालचालींची बातमी राजपुरीहून बाणकोटमार्गे आलेल्या एका ब्राह्मणाने दिली. त्यानेच मराठा सैन्य बाणकोटकडे आले नाही तर हबशी (सिद्दी) व आंग्रे यांनी



PRINCIPAL

संदर्भ :-


(१) गोगटे चि. ग., महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग-२, प्र. आ., इंदिरा, १९०७, पृ. ८१.

(२) सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे दफ्तर, खंड-३२, मुंबई सरकार, मुंबई, १९३३, लेखांक-९५, पृ. ८४-८५.

(३) पुरंदरे कृ. वा., भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला-३२, पुरंदरे दफ्तर, भाग-१, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२९, पत्रांक १०८, पृ. ७६-७७.

(४) उपरोक्त, पत्रांक-१००, पृ. ६९-७०. / डबू दा. गो., कुलाबकर आंग्रे सरखेल (आंग्रे शकावली), बॉम्बे, १९३९, पृ. ३७.

(५) सरदेसाई गो. स. (संपा.), कुलकर्णी कृ.पा., काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३३, लेखांक-१९, पृ. १६.

(६) पारसनीस द. ब., धावडशी येथील उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, (स्वामीला आलेली पत्रे) पत्रांक-२०३, पृ. २०६.

(७) सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड-३०, शाहू व पहिले दोन पेशवे, संकीर्ण (१७००-१७४०), मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक-९५, पृ. ६९, ७०, ७१.

(८) सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, जंजिऱ्याची मोहिम (पुरवणी), खंड-३३, मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक-५१, पृ. ४३.

(९) उपरोक्त, पत्रांक-१२१, पृ. १०५.

(१०) सरदेसाई गो. स. (संपा.), खंड-३०, उपरोक्त, पत्रांक-१७०, पृ. १४४.

(११) सरदेसाई गो. स. (संपा.), खंड-३३, उपरोक्त, पत्रांक-३५८, पृ. ३०९.

(१२) उपरोक्त, पत्रांक-१६१, पृ. १५०-१५१.

(१३) उपरोक्त, पत्रांक-१९६, पृ. १६५-१६६.

(१४) उपरोक्त, पत्रांक-१९९, पृ. १६८-१६९.

(१५) उपरोक्त, पत्रांक-२५६, पृ. २२९.

(१६) उपरोक्त, पत्रांक-३३३, पृ. २८९.

(१७) उपरोक्त, पत्रांक-३६१, पृ. ३१४-३१५.

(१८) उपरोक्त, पत्रांक-३३६, पृ. २९२-२९३.





PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri 415203




How to Identify Scopus Index...

Computational Fluid Mechanics
LEARN MORE >

Computational Fluid Mechanics
LEARN MORE >

Humanities Literature and Arts Journals | Journals | PHD

# UGC-CARE List of Journals – Arts and Humanities – 2022

By ilovephd - January 17, 2022

36106




The UGC-CARE List is classified into

i) Sciences ii) Social Sciences iii) Arts and Humanities and iv) Multidisciplinary based on Science Journal Classification (ASJC) codes, which

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad,Dist.Ratnagiri.415203.

11:45 78%

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Edwardsville | | |
| 96 | Hindi Anusheelan | Bhartiya Hindi Parishad | 2249-930X | NA |
| 97 | Hindustani Zaban | Mahatma Gandhi Memorial Research Centre | 0378-3928 | NA |
| 98 | History Compass | John Wiley and Sons, Inc. | NA | 147 054 |
| 99 | History Research Journal | Dr. Omshiva Ligade | 0976-5425 | NA |
| 100 | History Today | Indian History and Culture Society | 2249-748X | NA |

NIMS University Jaipur
20000+ Students in Campus, 5500+ Faculties, 2000+ Recruiting Companies. Apply Now!
Nims University Jaipur
Open

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri.415203